SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
email- stores@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४,महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, भांडार विभाग ०२३१-२६०९०८५/८६

Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

क्र. शिवाजी विद्या./वसतिगृह/भोजन समिती/355 दिनांक: 16 NOV 2026

प्रति,
संबंधित पुरवठाधारक

विषय :— दरपत्रके पाठविण्याबाबत ..

महोदय,

आपणास विदितच आहे की, विद्यापीठाचा ६३ वा दीक्षांत समारंभ दि.२७/११/२०२६ रोजी विद्यापीठाच्या प्रांगणात साजरा होत आहे. सदर सोहळ्यास उपस्थित मान्यवरांसाठी शाकाहारी भोजन व्यवस्था करण्याची असून त्यासाठी अपेक्षित भोजनाचे मेनू सोबत जोडले आहेत.

सोबत दिलेल्या मेनुंचा विचार करता सध्या बाजारभावानुसार जे दर अपेक्षित आहेत त्याप्रमाणे दरपत्रके मागविण्यात आली आहेत. सदरची दरपत्रके सादर करतेवेळी सोबतचे अटी व नियम लागू राहतील.

त्यानुसार सदरची दरपत्रके दिनांक २१/११/२०२६ पूर्वी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत विद्यापीठ कार्यालयामध्ये खोली क्रमांक १३४ भांडार विभाग येथे समक्ष येवून जमा करावीत.

दरपत्रके सादर करतेवेळी बाजारभावाप्रमाणे वाजवी (त्मेंवदंइसम) दर देण्यात यावा. यामध्ये जर अति कमी किंवा अति जास्त दर सादर केलेस दरपत्रके नाकारण्याचे संपूर्ण अधिकार विद्यापीठास असतील. उपस्थितांची जेवणाची सोय दरसाल प्रमाणे अतिथीगृहाच्या भोजन कक्षामध्ये तसेच बाजूच्या लॉन मध्ये करण्यात येणार असून त्या ठिकाणी टेबल, खुर्च्या त्याचे फ्रिल, आवश्यकतेनुसार कनात व मंडप लावणेत येईल त्यानुसार आवश्यक ठिकाणी मंडप, कनात व टेबल फ्रिल, हात धुण्याचे बेसिन, फॅन ची सोय विद्यापीठ प्रशासनामार्फत करण्यात येईल.

१. पुरवठा करण्यात येणारे भोजनाचे मेनू यासाठी आवश्यक साहित्य (उदा. भाज्या, डाळी, तेल, तांदुळ, मसाले) हे उच्च प्रतिचे वापरणे आवश्यक आहे.
२. प्रत्यक्ष भोजना दिवशी उपस्थित वाढपी यांनी स्वच्छ एकसारखे ड्रेस, डोक्याला कॅप, ग्लोव्हज वापरणे आवश्यक आहे.
३. जेवणासाठीची भांडी स्वच्छ असावीत तसेच ताटे, वाटया स्वच्छ व चांगल्या प्रतिचे असावेत (प्लॅस्टिक अथवा हलक्या मटेरीयल चे वापरू नयेत)
४. पिण्याचे ग्लास कागदी असावेत, तसेच आईस्क्रिम साठी वारण्यात येणारे कप कागदी असावेत चमचे लाकडी असावेत (प्लॅस्टिक कप चमचे वापरू नयेत)
५. भोजनाची जागा भोजनापूर्वी स्वच्छ देण्यात येईल तथापी भोजनानंतर सदरचा परिसर स्वच्छ करून देणे आवश्यक राहील
६. बीले सादर करतेवेळी विद्यापीठ लेखा नियमानुसार फुड लायसन्स, पॅन कार्ड, जीएसटी क्रमांक इ. आवश्यक बाबी तपासल्या जातील. तसेच दरपत्रक सादर करतेवेळी सदरबाबतची कागदपत्रे दरपत्रकासोबत जोडण्यात यावीत.
७. दरपत्रके उघडण्यादिवशी आपणास भ्रमणध्वनीद्वारे बोलविण्यात येईल. त्यावेळी प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे.
८. सदरचे भोजन हे बुफे पद्धतीने करावयाचे असून एकूण ३५० लोक भोजनासाठी उपस्थित राहणार आहेत. त्यानुसार किमान ०३ बुफे स्टॉल अपेक्षित असून विद्यापीठाचे अधिकारी व पाहूणे यांचेसाठी प्रत्यक्ष जागेवर भोजन वाढावे लागणार आहे. त्यानुसार भोजन पुरवठा प्रत्यक्ष जागेवर करावा लागेल.

९. भोजनाची वेळ व प्रत्यक्ष संख्या याबाबत कार्यक्रमाआधी तीन ते चार दिवस कळविण्यात येईल.

१०. भोजनाचा मेनू पुढीलप्रमाणे राहील

मेनू
स्टार्टर—सूप
पंजाबी भाजी व्हेज हंडी
महाराष्ट्रीन भाजी—भेंडी फ्राय/मटकी उसळ
ग्रीन सलाड/कोशींबीर
शाही खीर (रजवाडी खीर गुलाबजामून सहीत)
मिनी बटाटेवडा/कटलेट
फुलका/मिनी चपाती/पुरी
ग्रीन चटणी
व्हेज पुलाव/खुष्का राईस
डाळ तडका/डाळ फ्राय
लोणचे, पापड, मीठ, लिंबु, मुखवास
आईस्क्रिम (नामांकित कंपनीचे)
मिनरल वॉटर
उपवासाचे पदार्थ—केळी/वेफर्स/बटाटे चिवडा/शाबु खिचडी

११.सदर दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रिक व दराची दरपत्रक) भरावयाची आहे सदर दोन लिफाफा पध्दतीत अंतर्भाव असलेल्या बाबी पुढीलप्रमाणे— अटी व नियम :—

लिफाफा क्र.१. तांत्रिक निविदेचा लिफाफा

१. संस्था नोंद प्रमाणपत्र/ २. अन्न व औषध विभागाकडील प्रमाणपत्र २. ग्रांहकांची यादी /अनुभवचा दाखला

३. संस्थचे/ठेकेदाराचे पॅन कार्ड ४. वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५. अंदाजीत रक्कम दरपत्रकापेक्षा खाली आल्यास सदरचे दरपत्रक रदद करण्याचे अधिकार समितीस राहतील.

लिफाफा क्र. २. दरपत्रकाचा लिफाफा

१. दर नमूद केलेली आणि स्वाक्षरी व शिक्क्यासह असलेली दराची प्रत सर्व करासहित व विद्यापीठ पोहोच द्यावी.

उपकुलसचिव
तथा समिती प्रमुख अतिथी समिती,
दीक्षांत समारंभ २०२६